Carl D'Silva
Wildlife Artist
A2 Ashiyana, Caranzalem, Ilhas, Goa 403 002. INDIA

सकाळ - 25th MARCH. '98.

# मनमोहक निसर्ग कॅनव्हासवर उतरतो तेव्हा!

मुंबई, ता. २४ : अल्पावधीत उत्कृष्ट निसर्ग चित्रकार म्हणून आंतरराष्ट्रीय स्तरावर ख्याती मिळविलेल्या कार्ल डिसिल्व्हा यांनी आपल्या कुंचल्यात नेमकेपणाने पकडलेल्या मनमोहक निसर्गदृश्यांचे प्रदर्शन 'कॉन्झर्वेशन ऑन कॅनव्हास' हे सध्या बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या (बीएनएचएस) सभागृहात सुरू आहे.

'बीएनएचएस'च्या नोकरीत असताना १९८६ ते ८९ या काळात श्री. डिसिल्व्हा यांना अनेक निसर्ग व वन्यजीव निरीक्षकांच्या तसेच पर्यावरण अभ्यासकांच्या सान्निध्यात राहण्याचा योग आला. याच काळात त्यांनी स्वतःही वन्यजीव निरीक्षणास सुरुवात केली आणि त्याबाबत बरेच ज्ञान मिळविले. यातूनच पारंपरिक चित्रकलेकडून वन्यजीव आणि निसर्गचित्रांकडे वळण्याची प्रेरणा त्यांना मिळाली.

इंग्लंडमधील प्रीमियम वाइल्ड लाईफ आर्ट या वन्यजीव चित्रकारांच्या संघटनेतर्फे त्यांच्या लंडनमधील माल गॅलरीमध्ये होणाऱ्या वार्षिक प्रदर्शनाकरिता चित्राची निवड होणारे श्री. डिसिल्व्हा हे पहिलेच आणि अद्याप एकमेव भारतीय ठरले. त्यांच्या चित्रांची युरोपीय समीक्षकांनीही मुक्त कंठाने प्रशंसा केली.

गेली काही वर्षे ते पक्षीनिरीक्षकांना उपयुक्त ठरणाऱ्या पक्ष्यांची चित्रे असलेल्या पुस्तिकांच्या निर्मितीत व्यग्र आहेत. युरोप व भारत खंडातील पक्षीनिरीक्षकांमध्ये या पुस्तिका अल्पावधीतच लोकप्रिय झाल्या आहेत. प्रथम त्यांनी विख्यात पक्षीनिरीक्षक डॉ. सलीम अली यांच्या गाजलेल्या 'द बुक ऑफ इंडियन बर्ड्स'मधील ५३८ चित्रांपासून सुरुवात केली. एका ब्रिटिश संस्थेसाठी भारतीय पक्ष्यांवरील मार्गदर्शिका तसेच जगातील पोपट, चित्तर, कवडे आणि ग्राऊस पक्ष्यांवरील छोटे निबंध आदींचा त्यांच्या कारकिर्दीतील ठळक वैशिष्ट्य म्हणून उल्लेख करावा लागेल.

सध्या श्री. डिसिल्व्हा पूर्व आशियातील पक्षी, तसेच भारतातील शिकारी पक्ष्यांसदर्भातील चित्रांचे काम करीत आहेत.

भारतीय हत्तींवरचे 'मस्ती में' किंवा सोनेरी गरुडाचे 'हिज मॅजेस्टिज लुक आऊट', 'काश्मिरी हरणांचे', 'बगलिंग डाऊन द स्लोप' अशी एकाहून एक सरस १९ वन्यप्राण्यांची चित्रे या प्रदर्शनात मांडण्यात आली आहेत. पशू-पक्ष्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण चित्रांबरोबरच त्यांच्याभोवतालच्या निसर्गाचेही उत्कृष्ट चित्रण श्री. डिसिल्व्हांनी केले आहे. हे प्रदर्शन २९ तारखेपर्यंत रोज दुपारी १२ ते रात्री ८ पर्यंतच्या काळात सर्वांसाठी खुले आहे.





कार्ल डिसिल्व्हा यांच्या वन्यप्राणी चित्रांचे प्रदर्शन सध्या बॉम्बे नॅचरल हिस्ट्री सोसायटीच्या सभागृहात सुरू आहे. त्यातील ही दोन मनोवेधक चित्रे. (बातमी पान २ पाहा)